केरोसीन वाहतुकीकरिता मंजूर करण्यात येणाऱ्या पथकराबाबत (TOLL TAX).

महाराष्ट्र शासन

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

शासन निर्णय क्रमांकः रॉकेल-२०१७ /प्र.क्र.३५ / ना.पु.२७,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय विस्तार, मुंबई

दिनांक: २४ नोव्हेंबर, २०१७.

वाचा -

शासन निर्णय, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, क्र .रॉकेल १५११/ ३०८२/ प्र.क्र.३०५/ ना.पु.२७, दि.१० जुलै, २०१३.

प्रस्तावना-

सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत घाऊक केरोसीन परवानाधारकांना तेल कंपन्यांच्या डेपोमधुन केरोसीनची उचल करुन संबंधीत जिल्हयांमध्ये/ शिधावाटप क्षेत्रांमध्ये अर्धघाऊक / किरकोळ केरोसीन परवानाधारकांना केरोसीन पुरवठा करावयाचा असतो. त्यामुळे तत्कालिन परिस्थिती तसेच फेडरेशन ऑफ महाराष्ट्र डिलर्स असोसिएशन यांनी केलेली विनंती लक्षात घेता तेल डेपो ते अर्धघाऊक/किरकोळ परवानाधारक या दरम्यान होणाऱ्या केरोसीनच्या वाहतुकीदरम्यान लागणाऱ्या पथकराची (TOLL TAX) भरपाई म्हणून राज्यातील सर्व घाऊक केरोसीन परवानाधारकांना प्रति कि.लि. रु.७०/- (रुपये सत्तर/-) इतकी रक्कम समान एकरुप दराने संदर्भाधीन शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आली होती. तथापि सद्यस्थितीत अनेक ठिकाणी पथकर वसुली बंद झालेली असल्यामुळे काही घाऊक केरोसीन परवानाधारकांना पथकर भरावा लागत नाही. सबब घाऊक केरोसीन परवानाधारकांना समान एकरुप दराने पथकर मंजूर करण्याबाबतच्या तरतुदींमध्ये कालानुरुप बदल करण्याबाबतचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. त्यानुसार घाऊक केरोसीन परवानाधारकांना पथकर मंजूर करण्याबाबत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

शासन निर्णय : -

अ) राज्यातील घाऊक केरोसिन परवानाधारकांना सर्वच टँक लोडकरीता यापुढे सरसकट पथकर (टोल टॅक्स) मंजूर करण्यात येऊ नये.

ब) सद्यस्थितीत ज्या जिल्ह्यांमध्ये घाऊक केरोसिन परवानाधारकांना एकाही केरोसिन टँकलोडकरीता पथकर भरावा लागत नसेल अशा जिल्ह्यांमध्ये जिल्हाधिकारी यांनी कोणत्याही टँकलोडकरीता पथकर मंजूर करू नये. तसेच केरोसिनचे किरकोळ विक्री दर निश्चित करतांना त्यात पथकराच्या रकमेचा समावेश करू नये.

क) ज्या ठिकाणी एकाच जिल्हयामध्ये काही टँकलोडकरीता पथकर भरावा लागत असेल व काही टँक लोडकरीता पथकर भरावा लागत नसेल अशा ठिकाणी केरोसिनचे किरकोळ विक्री दर निश्चित करतांना त्यात सद्यस्थितीप्रमाणेच समान एकरूप दराने रू.७०/- प्रति कि.ली इतक्या पथकराच्या रक्कमेचा समावेश करावा. तथापि ज्या ठिकाणी घाऊक परवानाधारकास ज्या टँकलोडकरीता पथकर भरावा लागलेला नसेल अशा घाऊक केरोसिन परवानाधारकांकडून सदर पथकराच्या रकमेची वसूली दरमहा करण्यात यावी व सदर रक्कम दरमहा शासकिय खजिन्यात जमा करण्यात यावी.

ड) तसेच सद्यस्थितीत ज्या जिल्ह्यांमध्ये घाऊक केरोसिन परवानाधारकांस एकाही केरोसिन टँक लोडकरीता पथकर भरावा लागत नाही अशा जिल्ह्यांमध्ये भविष्यात काही टँक लोडकरीता पथकर भरावा लागल्यास संबंधित जिल्हाधिकारी यांनी उक्त मुद्दा क्र.(क) नुसार कार्यवाही करावी.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७११२४१५४११४१७०६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Uddhav Dattatraya Walunj

Digitally signed by Uddhav Dattatraya Walunj
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Food,civil Supplies and Consumer Protection Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3e52cab4406cc0eafdac51ee7f716de23ff575342e86fcb658bbfd2de90eba24, cn=Uddhav Dattatraya Walunj
Date: 2017.11.24 15:44:24 +05'30'

(उ.द.वाळुंज)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. सर्व विभागीय आयुक्त,
२. सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व उपनगर वगळून)
३. नियंत्रक शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा मुंबई,
४.सर्व उप आयुक्त (पुरवठा),
५.सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी,
६.सर्व अन्न धान्य वितरण अधिकारी,
७.वित्तीय सल्लागार व उप सचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
८.संचालक, नागरी पुरवठा,पुरवठा आयुक्त कार्यालय, मुंबई
९.राज्य स्तरीय समन्वयक, तेलउद्योग महाराष्ट्र राज्य
१०.मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई.
११.मा.मंत्री, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव,
१२.मा.राज्यमंत्री, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव,
१३.मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा, मुंबई
१४.मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद, मुंबई
१५. वित्त विभाग (कार्या/व्यय-४)
१५.निवडनस्ती